# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०४/०५/२०१९

### मा. विशेष स्थायी समिती सभा
### सभा सूचना क्र. ०२

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ........................................................
**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०७/०५/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०७/०५/२०१९ सभा सुचना क्र. ०२ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ०३ | पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत. |
| ०४ | मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत. |

दिनांक :- **०४/०५/२०१९**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती विशेष सभा दि.06/05/2019
## सार्व. आरोग्य विभाग
## // गोषवारा //

**प्रकरण :- 03 पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा दि.04/03/2019 रोजीच्या दै. मुंबई मित्र व दै. संध्याकाळ या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435251_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 03 निविदाधारक मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एम.बी.ब्रदर्स व मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा. लि. या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा उघडण्यात आला होता. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते. मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/5/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.

मा. स्थायी समिती विशेष सभा दि. 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवून दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

नाले सफाईचे काम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पुर्ण करणे आवश्यक असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा. स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे.आशापुरा कंन्स्ट्रकशन कंपनी यांना दि. 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. ठेकेदारा समेवेत केलेल्या चर्चेनुसार नाले सफाई कामामधून निघणारा गाळा, माती शहराबाहेरील खाजगी जागा उपलब्ध करून टाकवा लागत आहे, तसेच नाले सफाईचे काम हे विशेष स्वरुपाचे व कालमर्यादेत पुर्ण करावे लागणार असल्याने यासाठी मनुष्यबळासाठी जादा वेतन अदा करावे लागत असल्याबाबत ठेकेदाराने सांगितले असून खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Machinery, Equipments | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| A | POCLAIN MACHINE - 200 | Rs. 2,296/- PER HOUR | Rs. 2,050/- PER HOUR |
| | POCLAIN MACHINE WITH BOAT | Rs. 2,596/- PER HOUR | Rs. 2,300/- PER HOUR |
| | JCB MACHINE | Rs. 1,257/- PER HOUR | Rs. 1,100/- PER HOUR |
| B | DUMPER | Rs. 7,016/- PER SHIFT | Rs. 6,500/- PER SHIFT |
| | TORAS | Rs. 10,271/- PER SHIFT | Rs. 9,000/- PER SHIFT |
| | HAYDRA MACHINE | Rs. 1,306/- PER HOUR | Rs. 900/- PER HOUR |
| | CRAINE MACHINE | Rs. 5,192/- PER HOUR | Rs. 4,000/- PER HOUR |
| | JETTING MACHINE | Rs. 35,000/- PER HOUR | Rs. 25,000/- PER HOUR |
| | SEWER SUCKER MACHINE | Rs. 40,000/- PER HOUR | Rs. 30,000/- PER HOUR |
| c | MAN POWER | Rs.1,125/- PER LABOUR /PER DAY | Rs.1,075/- PER LABOUR /PER DAY |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई /खोदाई करणेकामी जे.सी.बी., पोकलन, बोटसह पोकलन मशिन, डंपर, टोरस, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, जेटींग मशिन, सिव्हर सक्कर मशिन व कंत्राटी हंगामी मजुर इ. पुरवठा करणेकामी मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी दि. 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
4/5/19

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती विशेष सभा दि.07/05/2019

## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण :- 04 मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे दि.04/03/2019 रोजीच्या दै. वृत्त मानस व दै. परशुराम समाचार या वृत्तपत्रात व Tender Id No. 2019_MBMC_435230_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

वर नमुद केलेल्या कामाकरीता प्राप्त 04 निविदाधारक मे. विंद्या ट्रेडर्स, मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. अक्षय इंटरप्रायजेस या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक यांचा दराचा लिफाफा (Financail Bid) उघडण्यात आला होता. मे.मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर इतर दोन निविदाकाराच्या तुलनेत कमी होते. मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी मा. आयुक्त यांच्या समवेत वाटाघाटी अंती मान्य केलेले दर दि.04/05/2019 रोजीच्या मा. स्थायी समिती विशेष सभेमध्ये सादर केले होते.

मा. स्थायी समिती विशेष सभा दि. 04/05/2019, ठराव क्र. 01 अन्वये सदरचे दर जास्त असल्याने ठेकेदारास पुनश्च: वाटाघाटी करणेकरीता बोलवून दर कमी करणेबाबत पुन्हा वाटाघाटी कराव्यात व दर कमी न केल्यास निविदा फेटाळण्यात याव्यात असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

पावसाळा सुरु होणेस अल्प कालावधी असून पुन्हा निविदा मागवून कार्यवाही पुर्ण करणेस लागणार कालावधी पाहता अत्यावश्यक बाब म्हणून मा.स्थायी समिती सभा ठरावाच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांना दि. 04/05/2019 रोजी दर वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार खालील नमुद दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविली असून वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | दि. 02/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर | मा. स्थायी समितीने सुचित केल्यानंतर दि.04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. - 10 HP | Rs. 560/- PER HOUR | Rs. 400/- PER HOUR |

मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10HP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी दि. 04/05/2019 रोजी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

4/5/19